**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण**

जा. क्र.झोपुप्रा/प्रशा/कार्या-१/टेबल२/३७६३/२०१४
दिनांक :-१३/१२/२०१४

सादर,

**विषय:- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या १३व्या बैठकीच्या इतिवृत्तास मंजुरी मिळणेबाबत.**

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची १३ वी बैठक दिनांक ०१.१२.२०१४ रोजी मा. ना. श्री. देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत, प्रा. अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ येथे संपन्न झाली. सदर बैठकीचे इतिवृत्त तयार करुन मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

**सचिव**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण**

१३/१२

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण**

**मा. प्रधान सचिव (गृहनिर्माण विभाग)**

**मा. मंत्री (गृहनिर्माण), महाराष्ट्र शासन**

**मा. मुख्यमंत्री तथा अध्यक्ष,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण**

प्रशासकीय इमारत, प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
दूरध्वनी : २६५६ ५८००, २६५९ ०४०५ / १८७९, फॅक्स : ०२२-२६५९ ०४५७, ई-मेल: info@sra.gov.in

## झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या १३ व्या बैठकीचे इतिवृत्त

मा.मुख्यमंत्री तथा अध्यक्ष,झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,मुंबई यांचे अध्यक्षतेखाली **दिनांक १/१२/२०१४** रोजी **दुपारी २.३०** वाजता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची १३ वी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदरच्या बैठकीस मा. मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य यांच्या समवेत खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | बैठकीस उपस्थित असलेले सन्माननीय सदस्य | पदनाम |
|---|---|---|
| **१** | **२** | **३** |
| १ | मा.ना.श्री देवेंद्र फडणवीस,मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य | अध्यक्ष |
| २ | मा.ना.श्री एकनाथ खडसे,मंत्री महसूल,महाराष्ट्र राज्य | विशेष निमंत्रित |
| ३ | मा.ना.प्रकाश मेहता,मंत्री उद्योग,महाराष्ट्र राज्य | विशेष उपस्थिती |
| ४ | मा.श्रीमती स्नेहल आंबेकर,महापौर,मुंबई | विशेष निमंत्रित |
| ५ | मा.श्री पी.एस.मीणा,मुख्य सचिव(प्रभारी),महाराष्ट्र राज्य | सदस्य |
| ६ | मा.श्री सिताराम कुंटे,आयुक्त,मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| ७ | मा. श्री मनुकुमार श्रीवास्तव,प्रधान सचिव,नगरविकास | सदस्य |
| ८ | मा.श्री देबाशीष चक्रबर्ती,प्रधान सचिव,गृहनिर्माण | सदस्य |
| ९ | मा.श्री एम.ई.सईद,प्रधान सचिव,विधी व न्याय विभाग | सदस्य |
| १० | श्री निर्मल देशमुख,मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण | सदस्य |

मा.मुख्यमंत्री तथा अध्यक्ष, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचे बैठक दालनात आगमन झाल्यानंतर प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मा.मुख्यमंत्र्यांचे तसेच सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले. मा.मुख्यमंत्री यांचे परवानगीने मुख्य कार्यकारी अधिकारी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी बैठकीची सुरुवात प्रास्तविकाने केली. बैठकीची टिपणी सर्व



**सचिव**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई**

सन्मानयीय सदस्यांना पाठविण्यात आली होती. त्या टिपणीतील मुद्यावर विषयवार संगणकाव्दारे सादरीकरण करण्यात आले.

**बाब क्रमांक १३/१ :- मुंबई शहर व उपनगरामध्ये झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा सद्यस्थिती अहवाल.**

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची स्थापना सन १९९६ मध्ये झाली. १९९६ मध्ये झोपडयांची संख्या अंदाजे ८ लाख तर त्यांत राहणा-यांची संख्या ४० लाख होती.आता सन २०११ च्या जनगणनेनुसार १०.४० लाख झोपडया व ५२ लाख लोकसंख्या झाली आहे अशी माहिती बैठकीत देण्यात आली. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत विकास नियंत्रण नियमावली १९९१ चे विनिमय ३३(१०), ३.११ व ३३(१४)(डी) अन्वये राबविण्यात येणा-या योजनांच्या प्रगतीचा तक्ता बैठकीसमोर सादर करण्यात आला. पुनर्वसन योजना सुरुझाल्यापासून आतापावेतो १,५८,८४५ इतक्या सदनिका पूर्ण झाल्याचे बैठकीत सांगण्यात आले. वाढत असलेल्या झोपडयांची संख्या,त्यांत राहणारे झोपडीधारक व आतापावेतो पूर्ण झालेल्या सदनिका यांचे प्रमाण विसंगत असून झोपडपट्टी पुनर्वसन योजना वेगाने पुढे जाणे आवश्यक असल्याचे बैठकीत मा.मुख्यमंत्री यांनी विशद केले. झोपडपट्टी पुनर्वसन योजना गतीमान करण्यासाठी येणा-या अडचणी व त्यावरील उपाय याचा तक्ता सादरीकरणाव्दारे बैठकीत मांडण्यात आला. यातील प्रत्येक मुद्दयावर खालीलप्रमाणे चर्चा होऊन निर्णय घेण्यात आला.

**१३/१/१ :-खाजगी जमिनीवरील झोपडपट्ट्यांच्या पुनर्विकासाबाबत.**

मुंबई शहर व विशेषत: उपनगरामध्येअनेक धर्मादाय ट्रस्ट तसेच इतर खाजगी व्यक्तींच्या जमिनींवर झोपडपट्टया आहेत. उदा. एफ.ई.दिनशॉ ट्रस्ट, जीजीभॉय बेहेरामजी,महमद युसुफ खोत, ऐ. एच. वाडीया ट्रस्ट,(कुर्ला इस्टेट) व्ही. के. लाल इत्यांदींच्या जमिनीवर मोठया प्रमाणात झोपडपट्टया आहेत व जमिन मालक म्हणून त्यांना झोपडपट्टी पुनर्वसन योजना सादर करण्याचा हक्क आहे.मात्र हे जमीन मालक झोपडपट्टी पुनर्वसन योजना दाखल करीत नाहीत वाझोपडीधारकांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना अथवा विकासकालाही झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी संमती देत नाहीत त्यामुळे या मोठया जमिनीवरील झोपडपट्टया विकासाविना पडून



सचिव
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई

मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई

आहेत अशी माहिती बैठकीत देण्यात आली. या ट्रस्टच्या व खाजगी व्यक्तींच्या अंदाजे २००० एकर जमिनीवर झोपडपट्टया असून यापैकी कोणत्याही जमीन मालकाने आतापावेतो स्वत:हूनझोपडपट्टी पुनर्वसन योजना सादर केलेली नाही.याबाबत बैठकीत सविस्तर चर्चा होऊन या जमीन मालकांना त्यांना जमीन मालक म्हणून योजना सादर करण्यासाठी नोटीस देऊन ठराविक मुदत देण्यात यावी. त्या मुदतीत झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा प्रस्ताव न आणल्यास महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास ) अधिनियम १९७१ चे तरतूदीनुसार या जमिनी संपादन कराव्यात असे सर्वानुमते ठरले व खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

ठराव:-

**वरील परिच्छेदात नमूद केलेल्या धर्मादाय संस्था व इतर खाजगी जमीन मालक यांनी त्यांच्या मालकीच्या जमिनीवर असलेल्या झोपडपट्टयांसाठी झोपडपट्टी पुनर्वसन योजना सादर करणेबाबत ३ महिने मुदतीची नोटीस देण्यात यावी. या मुदतीत संबंधित जमीन मालकांनी झोपडपट्टी पुनर्वसन योजना सादर न केल्यास अशा जमीनी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा निर्मूलन व पुर्नविकास) अधिनियम १९७१ च्या तरतूदीनूसार संपादन करण्याची कारवाई सुरु करण्यात यावी.जेणेकरुन या जमिनी संपादनाअंती शासकीय जमिनी म्हणून झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी उपलब्ध होतील असा ठराव सर्वानुमते पारीत करण्यात आला.**

**१३/१/२ :-प्रलंबित परिशिष्ट दोन प्रमाणित करणेबाबत.**

झोपडपट्टी पुनर्वसन योजना कार्यान्वित करण्यासाठी सुरुवातीस परिशिष्ट-२ प्रमाणित करणे आवश्यक असते. तथापि, म्हाडाच्या जमिनीवरील ९६ व बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जमिनीवरील ११७ योजनांची परिशिष्ट २ प्रमाणित करण्यासाठी दिर्घ कालापासून प्रलंबित असल्याने या योजनांमध्ये पुढील कार्यवाही करता येत नाही अशी माहिती देण्यात आली. म्हाडा व मनपा स्वत:च्या जागेवर झोपु योजना स्वत: करणार आहे. त्यामुळे ते वरील योजनेंचे परिशिष्ठ २ पारित करीत नाही असे



**सचिव**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई**

बैठकीत सांगण्यात आले. याबाबत मा.उच्च न्यायालय,मुंबई यांनी अवधेश तिवारी विरुध्द महाराष्ट्र शासन या याचिकेत जी योजना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण कार्यालयात सादर झाली आहे त्यावर अंतिम निर्णय होत नाही, तोपर्यंत त्या जागेवर इतर कोणतीही योजना दाखल करुन घेता येणार नाही असा निर्णय दिला आहे. या निर्णयामुळे वरील योजनांची जोपर्यंत तार्किक परिणिती होत नाही तोवर म्हाडांच्या योजना या जागेवर सादर करण्याचा प्रश्न उदभवत नाही अशी बाब बैठकीत निदर्शनास आणून देण्यात आली. अशाच प्रकारचे अभिप्राय राज्याच्या महाधिवक्ता यांनी यापूर्वीच दिल्याचेही बैठकीत सांगण्यात आले. महापालिका आयुक्तांनी परिशिष्ट २ प्रमाणित करण्यासाठी झोपडीधारकांचे पुरावे तपासणे तसेच काही प्रकरणांमध्ये कायदेशीर बाबी तपासावयाच्या असल्यामुळे परिशिष्ट २ प्रमाणित करण्यास वेळ लागत असल्याचे निदर्शनास आणून दिले. मा. मुख्यमंत्री यांनी चर्चेअंती असे सांगितले की, बृहन्मुंबई महानगरपालिका व म्हाडा यांच्याकडील प्रलंबित परिशिष्ट - २ प्रमाणित करण्याची कार्यवाही त्वरीत करण्यात यावी व त्यानुसार खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव :-

**बृहन्मुंबई महानगर पालिकेकडे प्रलंबित असलेल्या ११७ योजनांपैकी १०० योजनांचे व म्हाडाकडे प्रलंबित असलेल्या सर्व ९६ योजनांचे परिशिष्ट -२ पुढील ३ महिन्याच्या कालावधीत अंतिम करुन झोपडपटटी पुनर्वसन प्राधिकरणाकडे पाठवावे असा ठराव संमत करण्यात आला.**

**१३/१/३:- झोपडपट्टी विकास योजनांना जलदगतीने मान्यता देणे.**

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातर्फे पुनर्विकास योजनांच्या प्रस्तावांना विविध स्तरावर मान्यता देण्यात येते. त्यात आशयपत्र देणे, इमारत आराखडे मंजूर करणे. बांधकाम आरंभ करण्याचा परवाना देणे, भोगवटा प्रमाणपत्र देणे इत्यादीचा



**सचिव**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई**

प्रामुख्याने समावेश आहे. मात्र अशा परवानग्या देतांना प्रस्तावाची छाननी करण्यास मोठा कालावधी लागतो. हा कालावधी लागण्याचे मुख्य कारण म्हणजे इमारतीतील जीना, व्हरांडा,लिफ्ट लॉबी, लिफ्ट शॉप, इमारतीचा प्रवेश कक्ष (Entrance Lobby), Flower bed, ServiceDuctइत्यादीचे क्षेत्र मुळ चटई क्षेत्रामध्ये समाविष्ट करण्यात येत नाही व ते मोफत देण्यात येते. यामुळे मूळ चटई क्षेत्र अधिक मोफत दयावयाचे चटई क्षेत्र इत्यादीची छाननी करण्यात व प्रस्ताव मंजुरीसाठी तयार करण्यास कालापव्यय होतो. हे टाळण्यासाठी इमारतीच्या आतील सर्व बांधकाम चटईक्षेत्रामध्ये समाविष्ट केल्यास व तेवढे मूळ चटईक्षेत्र वाढविल्यास बांधकाम परवाना Auto Cad च्या सहाय्याने संगणकाद्वारे अचूक व वेगाने छाननी करुन मंजुर करता येईल. यामुळे पुनर्वसन योजना गतिमान होतील.अशा प्रकारच्या तरतुदी बँगलोर विकास नियंत्रण नियमावलीत समाविष्ट करण्यात आली आहे अशी माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा यांनी बैठकीत दिली.

यावर आयुक्त, बृहनमुंबई महानगर पालिका, प्रधान सचिव, नगर विकास व प्रधान सचिव, गृहनिर्माण यांनी अशी पध्दत अवलंबविल्यास निश्चितच विविध परवानग्या जलदगतीने देता येतील व विकास नियंत्रण नियमावली ३३ (१०) अंतर्गत सध्या प्रस्तावित असलेल्या बदलामध्ये याचा समावेश करण्यात येईल असे नमूद केले. यावर मा.मुख्यमंत्री यांनी हा बदल शक्य तितक्या लवकर प्रस्तावित करुन मान्यतेसाठी सादर करावा असे निर्देश दिले व चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

ठराव :-

**विकास नियंत्रण नियमावली ३३(१०) अंतर्गत परिशिष्ट IV मध्ये चर्चेप्रमाणे इमारतीच्या आतील सर्व बांधकामांचा चटईक्षेत्रात समावेश करुन तितके मूळ चटईक्षेत्र वाढून संगणक (Auto Cad) प्रणालीच्या सहाय्याने इमारत बांधकाम परवानगी देण्याची सुधारणा करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा असा ठराव संमत करण्यात आला.**

**१३/१/४:- नवीन विकास आराखडा - झोपडपट्टयांच्या जागेवरील आरक्षणाबाबत.**



**सचिव**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सन १९९२ मध्ये अंतिम करणेत आलेल्या आराखडयात अनेक अस्तित्वात असलेल्या झोपडपट्टयांवर खेळाची मैदाने/ मनोरंजनाच्या मैदानांची आरक्षणे टाकण्यात आली आहेत. शासनाच्या ३ जून १९९२ च्या अधिसूचनेप्रमाणे अशा आरक्षणावरील १/३ जागा रिकामी करणे व २/३ जागेवर योजना राबविणे या तरतुदी विरोधात सिटी स्पेस या स्वंयसेवी संस्थेने मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल करुन १०० टक्के आरक्षण ठेवणेबाबत अंतरिम आदेश घेतले आहेत. त्यामुळे अशा भूखंडावरील योजना नियोजन करुन त्यांची अंमलबजावणी करणे शक्य होत नाही व या योजना अव्यवहार्य होतात. या झोपडपट्टया गेल्या २०-२५ वर्षापासून आहे त्या स्थितीत आहेत अशी माहिती बैठकीत देण्यात आली.

सन २०१५ साली बृहन्मुंबई महानगरपालिका तयार करीत असलेल्या नवीन विकास आराखडयात सध्याच्या जमीन वापर पाहणीनुसार (Existing Landuse Pattern) झोपडपट्टया अस्तित्वात असलेल्या जागेवर आरक्षणे टाकू नये याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेला कळविण्यात यावे असे चर्चेमध्ये ठरले.

ठराव :-

**बृहन्मुंबई महानगर पालिकेतर्फे होणा-या नवीन विकास आराखडयामध्ये** Existing Landuse Pattern **चा विचार करता अस्तित्वात असलेल्या झोपडपटटयांच्या जागेवर आरक्षणे टाकण्यात येऊ नये व असे क्षेत्र झोपडपटटी क्षेत्र म्हणून दर्शविण्यात यावे असा ठराव पारीत करण्यात आला.**

**१३/१/५:-भारत सरकारच्या अखत्यारीतील प्रश्नाबाबत.**

भारत सरकारच्या रेल्वे,मिठागरे,मुंबई पोर्ट ट्रस्ट,संरक्षण खात्याच्या जमिनी,विमानतळ इत्यादी जमिनीवर मोठया प्रमाणात झोपडपट्टया आहेत.

तसेच CRZ-IIमधील झोपडपट्टयांचा प्रश्न भारत सरकारच्या पर्यावरण खात्याकडे प्रलंबित आहे. विमानतळाच्या परिसरातील इमारतीच्या उंचीवरील



**सचिव**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई**

बंधने रेल्वे लाईनलगत असलेल्या झोपडपट्ट्यांचा पुनर्विकास करताना सोडावयाचे ३० मिटर अंतर व यामुळे योजना अव्यवहार्य होणे, संरक्षण खात्याच्या जमिनी, पुरातत्व खात्याच्या अखत्यारीतील वास्तु तसेच विविध पेट्रोलियम कंपन्यांच्या शुध्दीकरण प्रकल्पाभोवती सोडावयाचे अंतर यामुळे योजना होऊ शकत नाही. मुंबई महानगर क्षेत्रातील झोपडयांची घनता, लोकसंख्याचा प्रश्न व जागेची कमतरता विचारात घेता झोपडपट्टी पुर्नवसन योजना व्यावहारिक होण्याकरिता भारत सरकारकडे महाराष्ट्र शासनातर्फे पत्रव्यवहार व पाठपुरावा करुन हे प्रश्न सोडविण्यात यावे असे चर्चेअंती ठरले.

ठराव :-

**राज्य शासनाचे स्तरावरुन याबाबत केंद्र सरकारच्या विविध विभागांकडे पाठपुरावा करावा व वरील प्रश्न सोडवावेत असे बैठकीत एकमताने ठरले.**

१३/१/६ :- **महाराष्ट्र झोपडपट्टी ( सुधारणा,निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ च्या कलम ३ के प्रमाणे मंजुर केलेल्या योजनांचा आढावा.**

महाराष्ट्र झोपडपट्टी ( सुधारणा,निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ च्या कलम ३ के नुसार मे. शिवालिक वेंचर्स, मे. आकृती सिटी,मे. रुचीप्रिया डेव्हलपर्स व मे. स्टर्लिंग बिल्डकॉन या चार विकासकामार्फत योजना कार्यरत असून त्यांचा प्रगती अहवाल तक्ता बैठकीत सादर करण्यात आला. यातील मे. शिवालिक वेंचर्स गोळीबार मैदान योजना वगळता इतर ३ योजनांच्या बाबतीत मा.उच्च न्यायालय, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या विविध निर्णयाच्या अधिन राहून प्रगती असमाधानकारक असल्यास त्यांना नोटीस देण्यात येऊन विहित कालावधीत अपेक्षित प्रगती साधण्यासाठी सूचित करणेत यावे आणि अशी अपेक्षित प्रगती न साधल्यास या योजना रद्द करण्याबाबत शासनास प्रस्ताव सादर करणेचे बैठकीत ठरले.



सचिव
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई

मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई

**ठराव :-**

**महाराष्ट्र झोपडपट्टी ( सुधारणा,निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१च्या कलम ३ के अंतर्गत मंजुरी दिलेल्या योजनांचा चर्चेत ठरल्याप्रमाणे पाठपुरावा करणेत यावा.**

**१३/१/७ :-योजना गतिमान करुन देण्यासाठी संक्रमण शिबिरांची उपलब्धता वाढविणेबाबत.**

**विकास** नियंत्रण नियमावलीतीलनियम ३३ (१४) ड अंतर्गत २.५ चटई क्षेत्रांच्या योजना सध्या कार्यान्वित आहेत.या योजनेस अल्प प्रतिसाद असून आतापावेतो १७८७ सदनिका पूर्ण झाल्या आहेत.या सदनिका झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पासाठी संक्रमण शिबीर म्हणून शिवशाही पुनर्वसन कंपनी मर्या. मार्फत भाडयाने देण्यात येतात.आतापावेतो अत्यंत अल्प सदनिका उपलब्ध झाल्याने योजनेचा उद्देश सफल होत नाही.सदरची योजना यशस्वी होण्यासाठी विकास नियंत्रण नियमावलीतील नियम ३३ (१४) ड मध्ये बदल करुन चटईक्षेत्र वाढविणे, सदर योजना मुंबई शहरात लागू करणे इत्यादी उपाय केल्यास संक्रमण सदनिकांची संख्या मोठया प्रमाणात वाढेल व त्यायोगे झोपडपटटी पुनर्वसन योजना तसेच विविध पायाभूत सुविधांचे जागेवर वसलेल्या झोपडपटटयांचे पुनवर्सन करुन या जागा रिकाम्या करता येतील. यामुळे मुंबई शहरातील विविध महत्वाचे पायाभूत प्रकल्प मार्गी लागतील. याबाबत चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

**ठराव :-**

**विकास नियंत्रण नियमावलीतील नियम ३३(१४) ड मध्ये चर्चेप्रमाणे सुयोग्य बदल करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा असा ठराव संमत करण्यात आला.**

**सचिव**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई**

**बाब क्रमांक १३/२:-**

**धारावी पुनर्वसन प्रकल्पाचा सद्यस्थिती अहवाल**

धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या सध्यस्थितीबाबतची माहिती बैठकीच्या सुरवातीस देण्यात आली. धारावी पुनर्विकास प्रकल्पांतर्गत एकूण भूखंडाचे अंदाजे क्षेत्रफळ २४० हेक्टर असून त्यापैकी विकासासाठी १५४ हेक्टर एवढे क्षेत्र उपलब्ध आहे. धारावी पुनर्विकास प्रकल्पविकासासाठी ५ सेक्टर मध्ये प्रस्तावित करण्यात आला आहे.सदर ५ सेक्टरच्या पुनर्विकासाबाबतआतंरराष्ट्रीय स्तरावर सन २०११ मध्ये निविदा मागविण्यात आल्या होत्या. परंतु काही तांत्रिक कारणास्तव सदर निविदा रद्द करण्यात आल्या.आता नवीन निविदा कागदपत्र तयार करण्याची प्रक्रिया सुरु असल्याची माहिती देण्यात आली तसेच धारावी अधिसूचित क्षेत्राचा पारुप विकास आराखडा प्रसिध्द करुन, सुचना हरकती विचारात घेऊन झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मान्यतेसह शासनास सादर केले आहे अशी माहिती बैठकीत देण्यात आली. चर्चेअंती मा. मुख्यमंत्री यांनी धारावी क्षेत्राकडे फक्त रहिवास पुनर्वसन करावयाचे आहे असा दृष्टीकोन न ठेवता त्या ठिकाणी मोठया प्रमाणात व्यवसाय व उद्योगधंदे सुरु असल्यामुळे त्या दृष्टीकोनातून रहिवास व औद्योगिक वसाहत (Residential cum Industrial Township )या धर्तीवर धारावीचा पुनर्विकास प्रस्तावित करण्यात यावा असे नमूद केले. तसेच ३०० चौ.फु.ची रहिवाशी सदनिका मोफत व त्यापुढील १०० चौ.फु.क्षेत्र बांधकाम खर्चघेऊन ४०० चौ.फुटांची रहिवाशी सदनिका देता येईल काययाची तपासणी करावी अशा सूचना दिल्या.चर्चेअंती खालीप्रपमाणे ठराव करण्यात आला.

ठराव :-

**धारावी झोपडपट्टीचा पुनर्विकास करणेसाठी रहिवास प्रयोजनासमवेत औद्योगिक वसाहत (Residential cum Industrial Township ) म्हणून पुनर्विकास करता येईल काय तसेच ३०० चौ. फूट व अधिक १०० चौ.फूट क्षेत्र दयावयाचे झाल्यास वाढीव क्षेत्राचा बांधकाम खर्च वसूल करुन ४०० चौ.फुटाची रहिवाशी सदनिका देता येईल काय याची तपासणी करण्यात यावी असा ठराव संमत करणेत आला.**



**सचिव**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई**

**बाब क्रमांक १३/३:-**

**विमानतळाच्या जागेवरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनांचा सद्यस्थिती अहवाल**

मुंबई विमानतळाच्या जागेवरील झोपडपटटी पुनर्वसन योजनेचे सद्यस्थितीबाबत सादरीकरण करण्यात आले. विमानतळाच्या अंदाजे २७६ एकर क्षेत्रावरील सुमारे ८०,००० झोपडयांचे पुनर्वसन प्रस्तावित करण्यात आले होते. सदर पुनर्वसन करिता समन्वय यंत्रणा (Nodal Agency) म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) यांची नियुक्ती केली आहे.

मुंबई आतंरराष्ट्रीय विमानतळ प्रा. लि. (MIAL) व मे.हाऊसिंग डेव्हलपमेंट अॅन्ड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड(HDIL)यांच्या दिनांक १५/१०/२००७ च्या खाजगी करारनाम्यानुसार विकासक मे. हाऊसिंग डेव्हलपमेंट अॅन्ड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड(HDIL) यांनी टप्प्याटप्प्याने मुंबई शहरात पात्र झोपडीधारकांसाठी घरे बांधून विमानतळाची जागा मोकळी करावयाची होती व त्या बदल्यात HDIL यांना ६५ एकर क्षेत्र मिळणार होते अशी माहिती बैठकीत देण्यात आली.

सदरील करारानुसार आजपर्यंत ७ ठिकाणच्या नियम ३.११ अंतर्गत HDIL यांच्या झोपडपटटी पुनर्वसन योजना प्राधिकरणातर्फे मंजूर करण्यात आल्या आहेत. त्या योजनांची सद्यस्थिती दर्शविणारा तक्ता बैठकीत सादर करण्यात आला. सद्यपरिस्थितीत MIAL यांनी HDIL यांच्याशी झालेला करारनामा व विकासक म्हणून त्यांची केलेली नियुक्ती रद्द केली आहे. प्रकरणीसध्या लवादाकडे सुनावणीसुरु आहे. सदर न्यायालयीन बाबीमुळे विमानतळाच्या जागेवरील झोपडयांच्या स्थलांतराचे काम थांबले आहे असे निदर्शनास आणू देण्यात आले.

महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने दि. ३०/०९/२००५ रोजी मुंबई विमान तळाच्या जागेवरील झोपडपट्टयाचे पुनर्वसन करण्यासाठी प्रारूप अधिसूचना प्रसिध्द केली आहे अशी माहिती बैठकीत देण्यात आली. या अधिसूचनेमुळे विमानतळाच्या जागेवरील झोपडयांचे पुनर्वसन होणे अपेक्षीत आहे. या पार्श्वभूमीवर बांधकाम पूर्ण होउन तयार असलेल्या **१०३४२** सदनिकांचा तात्काळ उपयोग होण्यासाठी तसेच मा. उच्च न्यायालयाने बृहन्मुंबईपालिकेकडे तानसा पाईप लाईन लगतच्या झोपडयांचे विहित मुदतीत पुनर्वसन करण्यासाठी दिलेल्या निर्देशांची



**सचिव**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई**

सविस्तर माहिती बैठकीत देण्यात आली. यावर मुंबई शहराच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांना गती देण्यासाठी आवश्यक असलेल्या सदनिका व तानसा पाईप लाईनसाठी लागणा-या सदनिका प्रथम मुंबई महानगरपालिकेस उपलब्ध करून देण्यात याव्यात अशा प्रकारचे निर्देश मा. मुख्यमंत्री यांनी बैठकीत दिले.

ठराव :-

**नियम ३.११ अंतर्गत एचडीआयएलने बांधून दिलेल्या सदनिका झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने चर्चेनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध पायाभूत प्रकल्पांची जागा रिकामी करण्यासाठी व तानसा पाईप लाईनसाठी उपलब्ध करून द्याव्यात असा ठराव करण्यात आला .**

**बाब क्रमांक १३/४:-**

**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे जमा असलेल्या निधीबाबतची सद्यस्थिती**

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून राबविल्या जाणा-या योजनांना विविध टप्प्यांवर परवानग्या दिल्या जातात. त्यावेळी शुल्क तसेच जमीन अधिमूल्य (Land Premium )आकारले जाते. आज मितीस झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे या स्त्रोतातून प्राप्त रक्कम विविध बँकांमध्ये ठेव म्हणून ठेवलेली आहे. सद्यस्थितीत १७२५.५३ कोटी ठेव रक्कम शिल्लक आहे.या शिल्लक रकमेचा विनियोग करण्याबाबतचा प्रस्ताव बैठकीसमोर ठेवण्यात आला.

बैठकीत चर्चा होउन जमिन अधिमूल्य ज्या संस्थेच्या मालकीची जमिन आहे त्यांना देण्यात यावे असे आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी सुचविले.

केंद्र शासनाची सन २०२२ पर्यत सर्वांना घरे अशी महत्वाकांक्षी योजना आहे. तसेच मुंबई मध्ये यापुढे अधिक झोपडपट्टया होऊ नये व मुंबईची लोकसंख्या बेसुमार वाढण्यावर प्रतिबंधक उपाय योजना करणे आवश्यक असल्याने मुंबई महानगरक्षेत्रात म्हाडा तर्फे खाजगी जमिनी विकत घेऊन तेथे मोठया प्रमाणत परवडणारी घरे बांधल्यास वाढत्या झोपडपट्टयावर प्रभावीपणे नियंत्रण आणता येईल. यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्रधिकरणाकडे उपलब्ध असलेल्या निधीतून रू.५०० कोटी म्हाडाकडे हस्तांतरित करावे व या निधीतून म्हाडाने मुंबई महानगर क्षेत्रात मोठया प्रमाणात



सचिव
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई

मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई

परवडणारी घरे बांधावीत असे प्रधान सचिव, गृहनिर्माण यांनी बैठकीत विशद केले. अशा प्रकारे घर बांधणी केल्यास केंद्र शासनाच्या २०२२ पर्यंत सर्वांना घरे या महत्वाकांक्षी योजनेची सुरवात मुंबई महानगर प्रदेशात होईल. तसेच मुंबईचा भार कमी होण्यास मदत होणार असल्याचे मत बैठकीत व्यक्त करण्यात आले. चर्चेअंती मा.मुख्यमंत्री यांनी जमिनीचे अधिमूल्य हे त्या त्या संस्थांना देणे संयुक्तिक आहे असे सांगितले. तसेच मुंबई महानगर क्षेत्रात परवडणारी घरे बांधण्याची योजना उपयुक्त असून त्यासाठी म्हाडाला रू.५०० कोटी देण्याबाबत सहमती दर्शविली. या नंतर खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

ठराव :-

**म्हाडा व बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या जागेवर होणाऱ्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनांच्या बाबतीत जमा झालेले व वेळोवेळी जमा होणारे जमिनीचे अधिमूल्य हे व्याजासह झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने म्हाडा व बृहन्मुंबई महानगर पालिकेकडे हस्तांतरीत करावे असे ठरले.**

**केंद्रशासनाच्या सन २०२२ पर्यंत सर्वांना घरे या महत्वाकांक्षी योजनेची पुर्तता करण्यासाठी तसेच मुंबईमध्ये अधिक झोपडपट्टी वाढू नये यावर प्रतिबंधक उपाय योजना करण्यासाठी मोठया प्रमाणावर मुंबई महानगर क्षेत्रात (MMR) परवडणारी घरे बांधण्यासाठी म्हाडाकडे रू.५०० कोटी हस्तांतरीत करावेत असे ठरले.**

**बाब क्रमांक १३/५:-**

**मुंबई शहरातील झोपडपट्टी पुनर्वसन योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी GIS Mapping करणे व त्यासाठी खाजगी संस्था नेमणेस मान्यता देणे.**

झोपडपट्टी पुनर्वसन योजना मुंबई शहर व उपनगरामधील विविध ठिकाणी सुरु असून त्या विखुरलेल्या स्वरुपात आहेत.या सर्व योजना एकमेकांशी संलग्न करुन एकाच नकाशावर



**सचिव**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई**

आणण्यासाठी प्रत्येक योजनेचे आधुनिक तंत्रज्ञान GPS/ETS चा वापर करुन मोजणी करणे, हद्दीचे अक्षांश/रेखांश संकलित करुन ते मुंबई शहराच्या उपग्रह नकाशावर (sattelite image) बसविणे आणि GIS कार्यप्रणालीचा वापर करुन योजनांची इत्यंभूत माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध करणे आवश्यक आहे.यामुळे Google Earthवर योजनेची संपूर्ण माहिती उपलब्ध होईल असे बैठकीत सांगण्यात आले.त्यावर चर्चाहोऊन खालील प्रमाणे ठराव मंजूर करण्यात आला.

**ठराव :-**

**मुंबई शहरातील झोपडपट्टी पुनर्वसन योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी GIS Mapping करणेकरीता जाहीर निविदा काढून खाजगी संस्था नेमणेस व येणा-या खर्चास मान्यता देण्याचा ठराव मंजूर करण्यात आला.**

**बाब क्रमांक १३/६ :-**

**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातील अभिलेख्यांच्या संगणकीकरणास मान्यता देणेबाबत( Document ManagementSystem (DMS) for Digitizationand Management Information System (MIS) ).**

**अ)प्राधिकरणातीलकार्यालयाच्याकागदपत्राचे Digitization करणेवहेकागदपत्र Document Management System (DMS) प्रणालीमध्येसमाविष्टकरणे.**

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाद्वारे मुंबई व मुंबई उपनगरातील विविध भागात वसलेल्या झोपडपट्टी क्षेत्राचे पुनर्वसन करण्यात येते. प्राधिकरणाकडे आज रोजी १८८४ योजनांवर कार्यवाही सुरु असून त्यापैकी १३६६ योजनांना प्राधिकरणाद्वारे मंजुरी देण्यात आली आहे.प्राधिकरणामध्ये योजना दाखल झाल्यानंतर झोपडीधारकांची पात्रता निश्चित होऊन पुढे विविध परवानग्या दिल्या जातात व योजना पुढे जाते. योजना दाखल झाल्यापासून ती पूर्ण होईपर्यंत मागोवा घेणे, पाठपुरावा करणे इ. साठी प्राधिकरणाकडे संगणक प्रणालीचा वापर करण्यात येत नव्हता.प्राधिकरणात योजनानिहाय नस्त्या उपलब्ध आहेत, त्यानुसार हे काम होत होते. सदर अभिलेख्याचे संगणकीकरण (Digitization) केल्यास प्राधिकरणातील



**सचिव**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई**

अधिकारी /कर्मचारी प्रत्यक्षात नस्ती न पाहता संगणक प्रणालीद्वारे नस्तीची पाहणी करुन त्या योजनेचा आढावा घेऊन कार्यवाही करु शकतील. त्याकरिता कार्यालयाने निविदा मागवून संगणक प्रणाली विकासित केलेली आहे. त्यानुसार प्राधिकरण कार्यालयाच्या १ कोटी २५ लाख कागदपत्रांचे संगणकीकरण करुन घेण्यासाठी निविदा काढली होती.आजपावेतो १ कोटी १८ लाख कागदपत्रांचे संगणकीकरण करुन Document Management System (DMS) प्रणालीमध्ये हे कागदपत्र समाविष्ट करण्यात आलेले आहेत. त्यासाठी रु.२,२४,२०,०००/- एवढा खर्च झालेला आहे. अद्यापही प्राधिकरणात अंदाजे १.५ कोटी कागदपत्रांचे संगणकीकरण करावयाचे आहे त्यासाठी रु.२,८५,००,०००/- एवढा खर्च अपेक्षित आहे.

वरीलप्रमाणे संगणकीकरण करण्यासाठी निविदा काढून केलेल्या खर्चास मान्यता तसेच उर्वरीत अभिलेखांचे संगणकीकरण करण्यास व त्यास येणा-या खर्चास मान्यता द्यावीबैठकीत विशद करण्यात आले.

**ब)झोपडीपटटी पुनर्वसन योजनांची माहिती व्यवस्थापन प्रणाली (Management Information System (MIS)) तयार करणे.**

प्राधिकरणातर्फे ज्या योजनांना मंजुरी दिली जाते त्या योजनांची विविध टप्प्यांवरील (उदा.Annexure-II, LOI, IOA, C.C, F.C.C, Part O.C, Full O.C) प्रगतीचा आढावा एकाचवेळी घेणेकरिता संगणकीय प्रणाली (MIS) विकसित करणे आवश्यक होते.अशी Management Information System (MIS) जाहीर निविदा मागवून संगणक प्रणाली (Software) तयार करण्यात आलेली आहे. ही संगणक प्रणाली सक्षम प्रधिकारी यांचे कार्यालयात होणा-या कामकाजासाठी व विशेषता परिशिष्ट-२ चे कामकाज कालबध्द पध्दतीने पुर्ण होण्यासाठी संगणीकीकरण करणे तसेच झोपडी धारकांचे पात्रतेसाठी येणा-या



सचिव
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई

मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई

अर्जावर स्वतंत्रपणे निर्णय होऊन त्यांना पात्रतेअंती स्मार्ट फोटोपास देणे या कामांचा यात समावेश करावयाचा आहे अशी माहिती प्रधान सचिव, गृहनिर्माण यांनी दिली. त्यासाठी येणाऱ्या रु. ९० लाख खर्चास मान्यता देण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आला. मा. मुख्यमंत्री यांनी झोपडपट्टीधारकांची स्वतंत्रणपणे पात्रता निश्चित करण्याची तरतूद यात असल्याने व त्यांना स्मार्ट फोटोपास मिळणार असल्याने योजना शिघ्र गतीने अंमलात आणावी असे बैठकीत निर्देश दिले. यावर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :-**

**प्राधिकरणाच्या कार्यालयातील कागदपत्रांचे Digitization करुन Document Management System (DMS) मध्ये समाविष्ट करणे त्याचप्रमाणे प्राधिकरणातर्फे ज्या योजनांना मंजुरी दिली जाते त्या योजनांच्या विविध टप्प्यावरील प्रगतीचा आढावा घेण्यासाठी तसेच, सक्षम प्राधिकारी यांचे कार्यालयातील कामकाजाची Management Information System (MIS) प्रणाली अंमलात आणण्यासाठी प्राधिकरणाच्या स्तरावर विहीत पध्दतीने निविदा काढून केलेल्या तसेच भविष्यात होणा-या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.**

**बाब क्रमांक १३/७:-**

**झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पात झोपडीधारकांचा सक्रिय सहभाग-प्रकल्प वेगाने पूर्ण करण्यासाठी प्रोत्साहनपर योजना राबविणे.**

**सदरचा प्रस्ताव पुढील बैठकीत सादर करावा असे मा.अध्यक्षांनी सूचित केले.**

**बाब क्रमांक १३/८:-**

**झोपडपट्टी पुनर्वसन योजना वेगाने मार्गी लावणे- विविध योजना राबविणे.**

झोपडपट्टी पुनर्वसन योजना वेगाने राबविण्यासाठी बैठकीत चर्चा करण्यात आली. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये दिनांक ३०.१०.२०१४ पर्यंत १३६६ योजना दाखल झाल्या असून आजपावेतो १.५८ लाख सदनिकांना भोगवटा प्रमाणपत्र दिले आहे. मुंबई शहरातील झोपडीत



सचिव
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई

मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई

राहणा-या १०.४० लाख कुटुंबांची संख्या लक्षात घेता पुनर्वसन योजनांचा वेग वाढविणे व योजना गतिमान करणे अत्यावश्यक आहे.

प्राधिकरणाने मंजुरी दिलेल्या अनेक झोपडपट्टी पुनर्वसन योजना या न्यायालयीन दावे, झोपडीधारकांच्या वाद / विसंवादामुळे अनिश्चित कालावधीपर्यंत प्रलंबित राहतात त्यामुळे पात्र झोपडीधारकांच्या पुनर्वसनास विलंब होतो आणि झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा उद्देश सफल होत नाही.

झोपडपट्टीवासीयांचा व विशेषत: महिला व मुली यांचा सहभाग वाढवून त्यांना योजनेची माहिती देणे, जेथे योजना पूर्ण झालेल्या आहेत तेथील कुटुंबियांचे जीवनमानात झालेला सकारात्मक बदल, आरोग्य, शिक्षण, सामाजिक प्रतिष्ठा यांच्यामध्ये पुनर्वसित इमारतीमध्ये राहण्यास गेल्यामुळे झालेला फरक ठळकपणे दाखविणे व योजना लवकर पूर्ण होण्यास त्यांना प्रवृत्त करण्यासाठी योजनेची माहिती देणे, प्रशिक्षित करणे व सातत्याने त्यांचे सोबत संवाद साधणे आवश्यक आहे. माहिती, प्रशिक्षण व संवाद (Information, Education & Communication - I.E.C.) या यंत्रणेमुळे झोपडीधारक व विशेषत: घरातील महिला व मुली सक्रिय होऊन वेगाने योजना पूर्ण होण्यासाठी मदत करतील.

योजना राबवताना होणा-या विलंबाचा अभ्यास करुन त्याबाबत उपाययोजना करण्यासाठी व योजना अधिक प्रभावीपणे व गतिमानपध्दतीने राबविण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना प्रस्तावित करण्यात येत आहेत.

**अ)प्रकल्प पर्यवेक्षण यंत्रणा नेमणे (Project Monitoring Agency) :-**

रखडलेल्या पुनर्वसन प्रकल्पांचा अभ्यास करुन त्यामध्ये असलेल्या विविध घटकांशी चर्चा व विचारविनिमय करुन प्रकल्प गतिने पूर्ण करण्याबाबतच्या विविध स्तरावर उपाययोजना सुचविणेसाठी प्रकल्प पर्यवेक्षण यंत्रणा (Project Monitoring Agency) नेमण्याचे प्रस्तावित आहे. या यंत्रणांना प्राधिकरण कार्यक्षेत्रात रखडलेले विविध पुनर्वसन प्रकल्प पर्यवेक्षणासाठी



सचिव
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई

मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई

देऊन त्यांचेमार्फत आढावा, अडचणीवर मात करण्यासाठी उपाययोजना करणे व प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करणेसाठी काम देण्यात येईल.

**ब) माहिती, प्रशिक्षण व संवाद यंत्रणा नेमणे (Information, Education &Communication- IEC):-**

पुनर्वसन प्रकल्पामध्ये अंतर्भूत झोपडीधारकांना प्रस्तावित पुनर्वसन प्रकल्प, त्याची कार्यपध्दती व त्याचे फायदे याबद्दल माहिती नसते असे निदर्शनास आले आहे. त्यांच्या अज्ञानामुळे पुनर्वसन प्रकल्पाबद्दल झोपडीवासीयामध्ये गैरसमज निर्माण होऊन प्रकल्पामध्ये वाद-विवाद निर्माण होतात त्यामुळे प्रकल्प रखडतो आणि झोपडीधारक त्याच्या लाभापासून वंचित राहतो. त्या अनुषंगानेझोपडीधारकांना व विशेषत: मुली व महिलांना माहिती देणे, प्रशिक्षित करणे व सतत संपर्कात राहून प्रकल्प वेगाने मार्गी लावण्यासाठी माहिती, प्रशिक्षण व संवाद (Information, Education & Communication - I.E.C.) यंत्रणा नेमणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

क) **कार्यालयीन व्यवस्थापन सुधारणा करणे व सक्षमीकरण करणे**

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण स्थापनेच्या वेळेस निर्धारीत करण्यात आलेले विहीत उद्दिष्ट शीघ्रगतीने आणि कार्यकुशलतेने गाठण्यासाठी प्राधिकरण कार्यालयाच्या कार्यपध्दतीचा आणि व्यवस्थापनाचा सर्वांगीण अभ्यास करणे आवश्यक आहे. अभ्यासानंतर प्राधिकरण कार्यालयाच्या व्यवस्थापनात आणि कार्यपध्दतीत वेळोवेळी आवश्यक बदल सुचविणेसाठी सल्लागार नेमणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

वरीलप्रमाणे आवश्यक इतक्या संख्येच्या प्रस्तावित यंत्रणा प्रथमत: 3 वर्षासाठी नेमण्यात येतील. सदर यंत्रणा नेमण्याच्या प्रस्तावास मान्यता मिळाल्यास स्पर्धात्मक पध्दतीने निविदा काढून यंत्रणांची निवड करण्यात येईल. या प्रस्तावास मान्यता देणेसाठी बैठकीत विनंती करण्यात आली.

ठराव :-

झोपडपट्टी **पुनर्वसन योजना गतीमान करणेसाठी**

**(अ)स्वतंत्र पर्यवेक्षण यंत्रणा** (Special Monitoring Agency).



**सचिव**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई**

(ब) प्रकल्प परिवेक्षण यंत्रणा (Project Monitoring Agency).

(क)माहिती, प्रशिक्षण व संवाद यंत्रणा (Information, Education and Communication-IEC),इत्यादी खाजगी यंत्रणा निविदेद्वारे नेमणेस व येणा-या खर्चास मंजुरी देण्याचा ठराव संमत करण्यात येत आहे.

बाब क्रमांक. - १३/९

विकास नियंत्रण नियमावली नियम ३३(१०) अंतर्गत परिशिष्ट IV मध्ये योजनेत झोपडीधारकांचा सहभाग वाढविण्यासाठी सुधारणा करणे.

सदरचा प्रस्ताव पुढील बैठकीत सादर करावा असे मा.अध्यक्षांनी सूचित केले.

बाब क्रमांक :- १३/१०

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील पात्र झोपडीधारकांना संक्रमण शिबीराची सोय उपलब्ध न झाल्यास त्यांना किमान घरभाडे ठरवून देणेबाबत.

सदरचा प्रस्ताव पुढील बैठकीत सादर करावा असे मा.अध्यक्षांनी सूचित केले.

बाब क्रमांक :- १३/११

प्राधिकरणाच्या योजनांना प्रसिध्दी देण्यासाठी जाहिरात संस्था नेमणेबाबत.

सदरचा प्रस्ताव पुढील बैठकीत सादर करावा असे मा.अध्यक्षांनी सूचित केले.

बाब क्रमांक -१३/१२

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण वांद्रे (पू)येथील कार्यालयीन इमारतीमधील ए, बी व सी विंग तसेच अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का)पूर्व उपनगरे कार्यालयाचे अंतर्गत सुधारणेच्या (furnishing) कामाकरिता मंजुरी मिळणेबाबत.

सदरचा प्रस्ताव पुढील बैठकीत सादर करावा असे मा.अध्यक्षांनी सूचित केले.

बाब क्रमांक १३/१३:-



सचिव
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई

**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या व धारावी पुनर्विकास प्रकल्पामधील अधिकारी/कर्मचा-यांना दिपावलीनिमित्त सानुग्रह अनुदान देण्याबाबतचा प्रस्ताव.**

**सदरचा प्रस्ताव पुढील बैठकीत सादर करावा असे मा.अध्यक्षांनी सूचित केले.**

**बाब क्रमांक १३/१४:-**

**सन २०१३-१४ च्या वार्षिक लेख्यांना मंजुरी व स्वीकृती देणेबाबत.**

प्राधिकरणाचे सन २०१३-१४ या वर्षाचे लेखे प्राधिकरणाच्या मंजूरीसाठी व स्विकृतीसाठी (Approval & Adoption) सादर करण्यात येत आहेत.सन २०१३-१४ वार्षिक लेख्यांतील ठळक बाबी पुढीलप्रमाणे आहेत.

| उत्पन्नाचे स्त्रोत | रुपये कोटीत |
|---|---|
| १. झो.पु.प्रा. भांडवल Xनिधी | १४१८.२४ |
| २. ठेवी व इतर दायित्वे | ६१९.७९ |
| | २०३८.०३ |

| निधीचा विनीयोग | रुपये कोटीत |
|---|---|
| १. स्थिर मालमत्ता | ४२.७० |
| २. गुंतवणूक | १८०१.६० |
| ३. ठेवी, अग्रिम व चालू मत्ता | १८६.३३ |
| ४. बँक खाते शिल्लक रक्कम | ७.४० |
| एकूण | **२०३८.०३** |



**सचिव**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई**

**१.सन २०१३-२०१४ च्या वार्षिक लेख्यांना मंजुरी व स्वीकृती (Approval & Adoption) देण्याबाबत.**

मे.के.एस.संघवी आणि कंपनी या अंतर्गत लेखा परिक्षकांनी प्राधिकरणाचे सन २०१३-२०१४ या वर्षाचे लेख्यांचे अंतर्गत लेखा परिक्षण पूर्ण केले आहे.सदर लेखे याद्वारे प्राधिकरणासमोर मंजूरी व स्वीकृतीसाठी (Approval & Adoption) सादर करणे आवश्यक आहे. सदर लेख्यांना प्राधिकरणाची मंजूरी व स्वीकृती (Approval & Adoption) प्राप्त झाल्यावर महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुर्नविकास) अधिनियम १९७१ मधील कलम ३ पी (२) अनुसार ते लेखे महालेखापाल यांचेकडून लेखा परिक्षण करुन त्याचा अहवाल शासनास व विधी मंडळास सादर करावयाचा आहे. मंजुरीनंतर सदर लेखे भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचेकडे लेखापरिक्षण करण्यासाठी सादर करण्यात येतील. प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

ठराव:-

**प्राधिकरणाच्या सन २०१३-२०१४ या वर्षाच्या लेख्यांना मंजूरी व स्वीकृती (approval and adoption )देणेबाबतचा तसेच सदर लेख्यांच्या बाबत स्वीकृती प्रमाणपत्र (Certificate of Adoption of Accounts) मा. महालेखाकार यांना देण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी,झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना प्रदान करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला.**

**२.झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे जमा होणा-या अधिक्य (Surplus) महसूल रकमेपैकी कमीत कमी ८५% इतकी रक्कम प्राधिकरणाच्या उद्दीष्टांसाठी पुढील पाच वर्षात खर्च करण्याबाबत.**

संचालक, आयकर विभाग (Exemption) यांचेकडील कलम १२ ए अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची नोंदणी करण्यात आली असून, Income Tax Act १९६१ मधील कलम ११ अन्वये सदर प्राधिकरणास आयकर मधून सूट देण्यात आली आहे. त्यामधील



**सचिव**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई**

मुख्य शर्त अशी की, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दर वर्षी प्राप्त होणा-या एकूण आधिक्य (Surplus) महसूल रकमेमधून कमीत कमी ८५% इतकी रक्कम प्राधिकरणाच्या उद्दीष्टासाठी खर्च करणे आवश्यक आहे. जर काही अपरिहार्य कारणास्तव सदरची ८५% रक्कम खर्च न झाल्यास, प्राधिकरण सदरची रक्कम सन २०१४-१५ पासून पुढील पाच वर्षात खर्च करण्यात येईल. तोपर्यंत शिल्लक निधी, आयकर तरतूद/कलम ११(५) अन्वये तात्पुरत्या स्वरुपात ठेव म्हणून गुंतवणूक करण्यात येईल. परंतु, सदरचा पर्याय हा कलम ११ (२) अन्वये Form No. १० व प्राधिकरणाच्या ठरावाच्या मान्यतेच्या प्रतिसह आयकर विभागास सादर करणे आवश्यक आहे. वरील तरतूदीच्या अनुषंगाने प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

**ठराव:-**

**कर निर्धारण (Assessment Year) वर्ष २०१४-२०१५ व वित्तीय वर्ष (Financial Year) २०१३-२०१४ मध्ये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे जमा होणा-या आधिक्य (Surplus) महसूल रकमेपैकी कमीत कमी ८५% इतकी रक्कम प्राधिकरणाच्या उद्दिष्टासाठी प्रामुख्याने झोपडपट्टीधारकांच्या पुनर्वसनासाठी सन २०१४-२०१५ पासून पुढील पाच वर्षात त्याच कारणास्तव खर्च करण्यात येईल. तोपर्यंत शिल्लक निधी आयकर अधिनियमाचे कलम ११(५) नुसार तात्पुरत्या स्वरुपात ठेव म्हणून गुंतवणूक करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला.**

सचिव
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

१३/१२/१४
मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

१५/१२/२०१४
मा. प्रधान सचिव (गृहनिर्माण विभाग)

मा. मंत्री (गृहनिर्माण), महाराष्ट्र शासन

मा. मुख्यमंत्री तथा अध्यक्ष,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण